# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## PGBUTR विभाग

**Ph.D./M.Phil. अभ्यासक्रम संचलित संशोधन सुविधा केंद्र/ठिकाण मार्गदर्शक नियमावली**

१. पी.एचडी./एम.फील अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने संशोधन वृध्दीगत होण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी संशोधन सुविधा केंद्र/ ठिकाण मंजूर केलेली आहेत.

२. विद्यापीठाच्या SU-PET परीक्षेस बसून पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना व M.Phil प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या संशोधन सुविधा केंद्र/ ठिकाण येथे प्रवेश घेण्यासाठी प्रवेश पत्र दिले जाईल. सदरच्या प्रवेश पत्रामध्ये नमुद केलेल्या सर्व सूचना वाचून घेऊन त्याची अंमलबजावणी करणेची जबाबदारी संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी यांची राहील. विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज विद्यार्थी कार्यालयास प्रवेश घेतल्या दिवसापासून एक महिन्यामध्ये सादर करावा तदनंतर विद्यापीठ नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

३. विद्यार्थ्याने Ph.D./M.Phil प्रवेशासाठी विद्यापीठाकडून प्रवेश पत्र मिळाल्यानंतर संबंधित संशोधन सुविधा केंद्र/ ठिकाण महाविद्यालयामध्ये संपर्क साधून नियमाप्रमाणे प्रवेश फी भरुन प्रवेश घ्यावा.

४. प्रवेश घेतल्यानंतर सदर विद्यार्थ्यास संबंधित महाविद्यालयाने ओळखपत्र/बोनाफाईड मागणीप्रमाणे दयावे.

५. प्रवेश घेतल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याने तो ज्या भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी पात्र आहे त्याचा फॉर्म अथवा समाज कल्याण खात्याच्या वेबसाईटवर ON LINE भरुन त्याची प्रत मार्गदर्शकाची स्वाक्षरी घेऊन संबंधित संशोधन सुविधा केंद्र/ ठिकाण/महाविद्यालय येथे सादर करावा. सदरचा अर्ज महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी तपासून मंजुरीसाठी भारत सरकार / समाज कल्याण कार्यालयाकडे नियमाप्रमाणे पाठवावा.

६. शिष्यवृत्ती बाबत काही शंका/अडचणी आल्यास संबंधित विद्यार्थी व संशोधन सुविधा केंद्र/ ठिकाण महाविद्यालय यांनी भारत सरकार /समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून त्याची सोडवणूक करावी.

७. महाविद्यालयाने संशोधक विद्यार्थ्यास पुस्तके, संशोधनपर मासिके तसेच इंटरनेट, Inflibnet ची उपलब्ध करुन द्यावी. तसेच संशोधनासाठी आवश्यकतेनुसार प्रयोगशाळा व खोली उपलब्ध करुन द्यावी.

८. मार्गदर्शकाने संशोधक विद्यार्थ्यास महाविद्यालयात संशोधन सुविधा केंद्र /ठिकाण येथे कार्यालयीन वेळेत मार्गदर्शन करावे.

९. संशोधन केंद्रावर संशोधक विद्यार्थी त्यांच्या संशोधनासाठी भेट देईल. त्यावेळेस त्याची हजेरी संशोधन सुविधा केंद्र/ठिकाण येथे ठेवावी. सदरची हजेरी विद्यापीठाने मागणी केल्यास विद्यापीठाकडे सादर करावी.

१०. प्रत्येक विद्यार्थ्याने त्याचे सहामाही प्रगती अहवाल संशोधक मार्गदर्शक याची स्वाक्षरी घेऊन संबंधित महाविद्यालयामध्ये जानेवारी/जुलै महिन्यामध्ये सादर करावा. महाविद्यालयाने प्राप्त झालेले सर्व सहामाही अहवाल ५ फेब्रुवारी/ ५ ऑगस्ट पूर्वी विद्यापीठ PGBUTR विभागास एकत्रितपणे सादर करावेत.

११. विद्यार्थ्यांने विहित वेळेमध्ये सहामाही प्रगती अहवाल न दिल्यास त्याचेकडून नियमाप्रमाणे रु. ५००/- दंडाची आकारणी प्रत्येक सहामाही अहवालासाठी करुन सदरची रक्कम एकत्रितपणे विद्यापीठ कार्यालयामध्ये प्रगती अहवाला सोबत जमा करावी. विद्यार्थ्याने प्रवेश घेताना जमा केलेली फी मधील विद्यापीठाचा हिस्सा सर्व विद्यार्थ्यांच्या प्रगती अहवाला सोबतच ५ फेब्रुवारी/५ ऑगस्ट पूर्वी यादीसह एकत्रितपणे सादर करावा.

१२. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे Ph.D/ M.Phil कोर्सवर्क परीक्षेसाठीचे परीक्षा अर्ज परीक्षा विभागाने दिलेल्या विहित मुदतीत परीक्षा विभागाकडे सादर करावे.

१३. महाविद्यालयाने संशोधन विद्यार्थी व मार्गदर्शक यांची बैठक वर्षातून किमान दोन वेळा मा. प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करावी व त्याचे रेकॉर्ड ठेवावे.

(कृ. मा. प.)

१४. Ph.D/ M.Phil अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या कोणत्याही विद्यार्थ्यांस थेट चौकशीसाठी अथवा इतर कामासाठी विद्यापीठातील PGBUTR विभागामध्ये पाठवू नये. विद्यार्थ्यांच्या अडचणीची सोडवणूक महाविद्यालयाच्या संशोधन सुविधा केंद्र/ठिकाण येथेच करावी. तदनंतर काही अडचणी असल्यास संबंधित प्राचार्यांनी लेखी स्वरुपात सदरची अडचण विद्यापीठ कार्यालयास कळवावी व मार्गदर्शन घ्यावे.

१५. महाविद्यालयाने Ph.D./M.Phil कोर्ससाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात आर्थिक तरतूद करावी.

१६. संशोधक विद्यार्थीकडून जमा झालेली फी ची रक्कम संशोधन सुविधा केंद्र / ठिकाणाच्या विकासासाठी वापरण्यात यावी. सेमीनार/कार्यशाळा इत्यादीचे आयोजनासाठी वापरावे.

१७. संशोधक व मार्गदर्शक यांना आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार परिषदा/ कार्यशाळा इत्यादी संशोधनपर उपक्रमासाठी आर्थीक सहाय्य करण्यात यावे.

१८. संशोधन सुविधा केंद्र / ठिकाणची फिची रक्कम विहित वेळेमध्ये न भरल्यास नियमाप्रमाणे संबंधित महाविद्यालयाकडून दंडाची आकारणी करण्यात येईल.

१९. संशोधन विद्यार्थ्यांचे संशोधन पूर्ण झाल्यानंतर त्याचा प्रबंध स्विकारण्यासाठीची फी विद्यापीठामध्ये भरुन घेतली जाईल. सदरचा प्रबंध संशोधन सुविधा केंद्र/ ठिकाण महाविद्यालय येथून रितसर ना-हरकत/नादेय प्रमाणपत्रासह महाविद्यालयाच्या लेटरहेडवर पत्र देऊन सादर करावा.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

---

Ref.No. - SUS/BCUD/PGBUTR/ 1008४

Dt :- 21 MAR 2014

**प्रति**

**१. मा.प्राचार्य / संचालक, सर्व संशोधन सुविधा ठिकाण / केंद्रे, सोलापूर, विद्यापीठ सोलापूर**
**२.मा.संचालक, विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुले, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**३.मा.परीक्षा नियंत्रक, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**विषय :- Ph.D./M.Phil.अभ्यासक्रम संचलित संशोधन सुविधा केंद्र/ठिकाण मार्गदर्शक नियमावलीनुसार कार्यवाही बाबत**

**महोदय / महोदया,**

उक्त विषयास अनुसरुन आदेशान्वये विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, पीएच.डी / फिल अभ्यासक्रम संचलित संशोधन सुविधा केंद्र / ठिकाणासाठी उक्त प्रमाणे सुधारीत नियमावली तयार करण्यात आलेली आहे. सदर नियमावलीनुसार कार्यवाही करण्यात यावी. नियमावलीनुसार जी महाविद्यालय कार्यवाही करत नसल्याचे निदर्शनास आल्यास सदर महाविद्यालय दंडास पात्र असेल याची कृपया नोंद घ्यावी.

**आपला विश्वासू**

21/3/14

**संचालक**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**